# मिरा भाईंदर महानगरपालिका
# जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

## दिवाळीच्या सुट्टीमध्ये देखील मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने कोव्हीड लसीकरण केंद्र राहणार सुरू

केंद्र शासनाच्या सुचनाना अनुसरून राज्यामध्ये व त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोविड लसीकरणाचा कार्यक्रम दि. १६/०१/२०२१ राजी पासून सुर झाला असून टप्याटप्याने वेगवेगळ्या वयोगटाचे लसीकरण सुरु करण्यात आले आहे. या संपुर्ण मोहिमेअंतर्गत यंत्रणेमार्फत केंद्र शासन विकसित कोविड प्रणालीच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या अहवालानुसार मिरा भाईंदर शहरातील शासकीय व खाजगी कोविड लसीकरण केंद्रामार्फत आतापर्यंत ६ लाख ४ हजार ७०८ लाभार्थ्यांना कोविड लसीकरणाचा पहिला डोस व ३ लाख ३० हजार ३७० लाभार्थ्यांना  कोविड लसीकरणाचा दुसरा डोस देण्यात आला आहे.

संभाव्य तिसऱ्या लाटेची तीव्रता कमी करण्याच्या दुष्टीने संपूर्ण शहरातील नागरीकांचे १००% लसीकरण पूर्ण करण्याच्या हेतूने मिरा भाईंदर शहरात संबंधित आरोग्य केंद्रांमधून ४२४ पथकांची नेमणूक करण्यात आली असून गृहभेटीमधुन लोकांशी संवाद साधण्यात येत आहे. लसीकरण विषयी असलेला लोकांच्या मनातील गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न तसेच संवाद, प्रबोधन, लोकशिक्षण या माध्यमाचा वापर करून वंचित नागरीकांना लसीकरणासाठी प्रोत्साहीत करण्यात येत आहे. या मोहिमेत सदर पथकासोबत वैद्यकीय विभागाचे लसीकरण पथक नेमण्यात आले असून गृहसंकुलन/औद्योगिक क्षेत्रांमध्ये अद्यापही लसीकरणापासून वंचित असलेल्या १८ वर्षावरील नागरीकांचे प्रथम तसेच दुसऱ्या डोस करीताचे लसीकरण करण्यात येत आहे. त्याचबरोबर ६ प्रभाग कार्यालयामधुन मोबाईल लसीकरण वॅनच्या टिममार्फत दुकाने, हॉटेल, मॉल, कॉल सेंटर, बँक, ई. आस्थापनांमधील नागरीकांच्या लसीकरणाच्या स्थितीचा आढावा घेऊन अद्यापही लसीकरणापासुन वंचित असलेल्या लाभार्थ्यांना तात्काळ लसीकरणाचा लाभ देण्यात येत आहे.

मिरा भाईंदर शहरातील नागरिकांना सदर लसीकरणाचा लाभ दिवाळीच्या सुट्टीमध्ये देखील घेता येणार आहे. मिरा भाईंदर शहरातील कोव्हिड लसीकरण केंद्रे ही दिवाळीच्या सुट्टीमध्ये बंद न ठेवता पहिल्या किंवा दुसऱ्या डोसपासून वंचित असणाऱ्या नागरिकांसाठी खुली ठेवण्याचे मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी निर्देश दिले आहेत. त्याचबरोबर मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात १०० टक्के लसीकरण पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवून दिवाळी सुट्टी मध्ये देखील ही लसीकरण केंद्र सुरू राहणार

आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात प्रामुख्याने पंडित भीमसेन जोशी रुग्णाल भाईंदर पश्चिम व इंदिरा गांधी, मिरा रोड पूर्व ही दोन लसीकरण केंद्र सुरू ठेवण्यात येणार आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने दैनंदिन लसीकरणाचे सुयोग्य नियोजन केले जात असून दुस-या दिवशीच्या लसीकरणाची माहिती आदल्या दिवशी संध्याकाळी व्हॉट्स ॲप, फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम अशा सोशल माध्यमांवरून प्रसिध्द करण्यात येत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महापौर ज्योत्सना हसनाळे व आयुक्त दिलीप ढोले यांच्यामार्फत मिरा भाईंदर शहरातील नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, कोरोना आजाराच्या संभाव्य तिसऱ्या लाटेची तीव्रता टाळण्याच्या अनुषंगाने १८ वर्षावरील लसीकरणाकरीता पात्र असलेल्या नागरिकांनी लवकरात लवकर लसीकरण पूर्ण करून घ्यावे व ३० नोव्हेंबर २०२१ रोजी पर्यंत मिरा भाईंदर शहरात १००% लसीकरण पूर्ण करण्यास मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करावे. तसेच कोविड लसीकरण केंद्राच्या ठिकाणी नागरिकांनी नाहक गर्दी करु नये व लसीकरणाच्या ठिकाणी नागरिकांनी मास्क परिधान करणेस तसेच सामाजिक अंतर (Social Distance) पालन करून लसीकरण सुलभरित्या होणेस महानगरपालिकस सहकार्य करावे.